## येता फिरून वादळ

येता फिरून वादळ घर हादरून गेले
येथील माणसांचे मन बिथरून गेले
केली कशीबशी मी बघ बोळवण सुखाची
दिसताच ते तयांना जन दुखवून गेले
त्यांचे असेच सारे कळणार ना कुणाला
संकेत नेत्र करता काही उमजून गेले
-----

सोडून देश आलो देशांतरास आता
गावात सर्व नाती चिंता जिवास आता
झालेत पोरके रे बघ मायबाप माझे
माझ्याविना तयांचा अडकेल घास आता
गावात राहिल्याला कित्येक काळ झाला
परक्या जगात मजला होतात भास आता
पैशात जीव माझा रमला कधीच नाही
पटणार का कुणाला सांगून खास आता
सांगू कसे तुला मी अवधान वेदनांचे
गुंतून जीव जाता सजणार त्रास आता
लाटांत भावनांच्या वाहून जात सागर
कां थांबला किनारा पाहून नाश आता

**- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**